# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

२२ ऑक्टोंबर, २०२०



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7447744100 (PRO)


# स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

## घरफोडी करून सोनेचांदीचे दागीने विक्री करणारा आरोपी जेरबंद

दिनांक २२/१०/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथक पोलीस स्टेशन घुग्घुस परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम घुग्घुस येथील सराफा लाईन बाजार मध्ये सोनेचांदीचे दागीने विक्री करणाच्या उद्देशाने संशयास्पदरित्या फिरत आहे. अशा माहितीवरून स्थागुशा पथकाने घुग्घुस येथील सराफा बाजारात जावुन पाहणी केली असता, मिळालेल्या माहितीप्रमाणे एक इसम संशयास्पदरित्या फिरत असता मिळुन आला. सदर इसमास ताब्यात घेवुन त्यांची झडती घेतली असता त्यांचे ताब्यात सोन्याचे दागीने ७०.६ ग्रॅम किं. ३,६०,०६०/—रू आणि चांदीचे दागीने ४१ ग्रॅम किं. २४,६००/—रू असा एकुण ३,६२,५२०/—रू चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर चोरीच्या मालाबाबत विचारपुस केली असता त्याने काही दिवसापुर्वी पोलीस स्टेशन घुग्घुस हद्दीत चोरी केली होती आणि याबाबत पोलीस स्टेशन घुग्घुस येथे अप.क्र २२५/२०२० अन्वये गुन्हा नोंद आहे. यावरून सदर आरोपी नामे रोहीत बुध्दराज कश्यप वय १९ रा. वार्ड क्र. ३ घुग्घुस चंद्रपुर या वरील गुन्हयात अटक करून ताब्यात घेण्यात आले तसेच आरोपी कडुन पोलीस स्टेशन घुग्घुस अप.क्र. २०७/२०२० कलम ३७९ भादंवि मधील बजाज पल्सर दुचाकी किं. ५०,०००/— रू. जप्त करण्यात आली आहे. सदर आरोपीकडुन गुन्हयातील एकुण ४,१२,५२०/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढिल तपास घुग्घुस पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. अरविंद साळवे आणि श्री. प्रशांत खैरे, अपर पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक स्थानिक गुन्हे शाखा श्री. ओ.जी.कोकाटे यांचे नेतृत्वात सपोनि. बोबडे, पोहवा. संजय आतकुलवार, पोहवा. धनराज करकाडे, पोना. महात्मे, पोशि. रविंद्र पंधरे, गोपाल आतकुलवार, प्रशांत नागोसे, अमोल धंदरे, संदीप मुळे यांनी पार पाडली.

---